**प्रेसनोट** दि.०१.०३.२०१९

**शिर्षक - मराठा जातीचा दाखला लवकरात लवकर काढून देण्यासाठी २०००/- रूपये लाचेच मागणी करणारे मयूर उर्फ विकी सुरेश नवगण, रा.३८५९, भवानी पेठ, बार्शी यांना रंगेहात पकडले.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | बार्शी शहर पोलीस स्टेशन सोलापूर शहर , गुरनं २०८/२०१९ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७(अ) प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | मयूर उर्फ विकी सुरेश नवगण, वय २७ वर्षे, संगणक चालक, समर्थ महा-ई-सेवा केंद्र बार्शी, रा. ३८५९, भवानी पेठ, बार्शी,जि.सोलापूर. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०००/- रूपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २०००/- रूपये. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे मराठा जातीचे असून तक्रारदार यांना महाराष्ट्र शासनाने नव्याने जाहीर केलेल्या मराठा समाजाच्या सामाजीक व शैक्षणीक आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी जातीचा दाखला काढावयाचा होता. त्यासाठी त्यांनी समर्थ महा ई सेवा केंद्र, बार्शी येथील श्री.विकी उर्फ मयूर सुरेश नवगण यांचेशी चर्चा करता त्यांनी तो जातीचा दाखला लवकरात लवकर काढून देण्यासाठी २०००/- लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडे तक्रार दिली होती.<br>त्यावरून सदर तक्रारीची दि.२७.०२.२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्याकडून पडताळणी करण्यात आली होती. त्यामध्ये तक्रारदार यांचेकडे विकी उर्फ मयूर नवगण यांनी दाखला दुसऱ्याच दिवशी काढून देण्यासाठी २०००/- रूपये लाचेची मागणी करून त्यातील ५००/- रूपये त्याच दिवशी तक्रारदार यांचेकडून घेतले व उर्वरीत लाचेची रक्कम दि.२८.०२.२०१९ रोजी घेवून येण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यावरून दि.२८.०२.२०१९ रोजी श्री.नवगण यांच्या विरूध्द लाचेचा सापळा लावला होता परंतू सदर दिवशी ते मिळून न आल्याने सापळा कारवाई तूर्त थांबविण्यात आली होती. आज दि.०१.०३.२०१९ रोजी पुन्हा यातील श्री नवगण यांच्या विरूध्द समर्थ महा ई सेवा केंद्रात लाचेचा सापळा लावण्यात आला. त्यामध्ये तक्रारदार यांचेकडून १५००/- रूपये लाच स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले आहे. यातील श्री.मयूर उर्फ विकी सुरेश नवगण, रा.३८५९, भवानी पेठ, बार्शी यांच्या विरूध्द बार्शी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **विशेष बाब** | |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार ॲप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |
| व्हॉटसॲप क्रमांक | :- | ९९३०९९७७०० |

**(अरूण देवकर)**
**पोलीस उपअधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो. सोलापूर.**

Scanned by CamScanner